बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क साधा

# विकास एक्सप्रेस

RG. MAH MAR 37476 / 2011

संपादक- राजेश रघुनाथराव गुंठे

D.21/07/2026 मो.न.-9403540100 Page-01




## आयसीआयसीआय बँकेत २३ कोटींचा 'गोल्ड लोन' घोटाळा

नागपूर,

Gold-loan-scam : आयसीआयसीआय बँकेच्या ९ विविध शाखांमध्ये बनावट सोन्याचे दागिने तारण ठेवून बँकेची २३ कोटी १९ लाख ४१ हजार ७५१ रुपयांची फसवणूकीच्या प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने गुन्ह्यातील फरार आरोपी दिनेश कृष्णराव नागपूरे (शेषनगर) याला सोमवारी अटक अटक केली.

न्यायालयाने आरोपीला ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

प्राप्त माहितीनुसार, आयसीआयसीआय बँकेचे विभागीय प्रमुख धनंजय रमेश थिटे (४९) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा घोटाळा उघडकीस आला. बँकेच्या मनीषनगर शाखेत गोल्ड लोन ऑडिट दरम्यान तारण ठेवलेले सोने बनावट असल्याचे प्रथम निदर्शनास आले. यानंतर संपूर्ण ९ शाखांचे ऑडिट केले असता, एकूण १५९ खातेदारांनी बनावट सोने तारण ठेवून कर्ज उचलल्याचे समोर आले. जानेवारी २०२३ ते आॅक्टोबर २०२५ दरम्यान बँकेचे खातेदार सचिन राऊत, व्हॅल्युअर (सोने पारखी) नंदू खरवडे, ऑडिटर राजेंद्र शिळणकर, प्रमोद टेटे, धनंजय ढोमणे आणि शाखा प्रमुख पंकज केकतपुरे यांच्यासह १५२ खातेदारांनी आपापसात संगनमत करून हा कट रचला होता. त्यांनी बनावट सोने खरे असल्याचे भासवून बँकेतून कोट्यवधींचे कर्ज घेऊन विश्वासघात केला. याप्रकरणी धंतोली पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता.


### आणखी काही जण रडारवर

या महाघोटाळ्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग झाल्यानंतर पोलिसांनी यापूर्वीच प्रमोद भैय्याजी टेटे, राजेंद्र पुंडलिकराव शिळणकर, पंकज प्रभाकर केकतपुरे आणि नंदू श्रीहरी खरवडे यांना अटक केली होती. आता या प्रकरणातील फरार आरोपी दिनेश नागपुरे यालाही अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करत आहेत.



**पंजाबच्या शेतकऱ्यांची दिल्लीकडे कूच, खनौरी आणि शंभू बॉर्डर सील; दिल्ली-कटरा एक्सप्रेसवे बंद**

**दिल्लीत दुहेरी आंदोलनाचा भडका! NEET आंदोलनानंतर आता शेतकऱ्यांचा दिल्लीकडे मोर्चा; सुरक्षा व्यवस्था अलर्टवर**



**अभिजीत दिपकेंचा दिल्ली पोलिसांवर गंभीर आरोप ! मुलीचे कपडे फाडले, छातीवर पाय दिला...**



**राज्यात आजपासून मान्सूनचा जोर वाढणार, बंगालच्या उपसागरापर्यंत कमी दाबाचा पट्टा**

## सायबर सुरक्षेचा जागर; श्री शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना डिजिटल सुरक्षिततेचे धडे

लातूर, दि. २० जुलै : श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सरस्वती कॉलनी, लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात इयत्ता ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी अशा दोन स्वतंत्र सत्रांद्वारे जवळपास १,००० विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या सत्रात सायबर वॉरिअर नरेश पंडित व सायबर वॉरिअर अविष्कार कांबळे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, OTP फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, मजबूत पासवर्ड तयार करण्याचे महत्त्व, डिजिटल गोपनीयता, सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्याचे उपाय तसेच सायबर गुन्ह्यांची तक्रार कुठे व कशी करावी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणे, प्रात्यक्षिके आणि दैनंदिन जीवनातील प्रसंगांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक जे. व्ही. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. पर्यवेक्षक ए. पी. तोगरे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले.